# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

क्र.एचओ/9659 /लेखा दि. 24.06.2022

**<u>कंत्राटी औषधनिर्माता पदासाठी जाहिरात</u>**

**विषय** :- प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती तसेच आरोग्य सेवेचे सार्वत्रिकरण या संकल्पनेच्या अंमलबजावणी बाबत

**संदर्भ** :- MGC/F/6649/21-06-2022

सार्वजनिक खात्यांतर्गत प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती तसेच आरोग्य सेवेच सार्वत्रिकरण या संकल्पनेच्या अंमलबजावणी साठी मा.आयुक्त यांची अनुक्रमे क्र. MGC/F/6649/21-06-2022अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. या अंतर्गत सर्वसामावेशक आरोग्य सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी HBT Clinic सुरू करण्यात येणार आहे. सदर HBT Clinic साठी **औषधनिर्माता** पदासाठी इच्छुक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानुसार सदर पदे स्थानिक पातळीवर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून निवडीने भरावयाची असल्याने सदर जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे.प्रतिसादादाखल प्राप्त होणा-या अर्जांची आवश्यक कागदपत्रांसह छाननी करून प्रस्तवित पदांच्या प्रमाणात पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. नियुक्ती आदेश कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या कार्यलयामार्फत काढण्यात येतील.

कंत्राटी औषधनिर्माता पदासाठीची शैक्षणिक अर्हता व कंत्राटी तत्त्वावरील नियुक्तीच्या अटी / शर्ती / सर्वसाधारण नियम खालील प्रमाणे आहेत

**शैक्षणिक अर्हता** :-उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसीमधील पदवी असणे आवश्यक आहे. (पदवीस प्राधान्य देण्यात येईल.)

1. उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा.
2. संगणक विषयक ज्ञान उमेदवार डीओईएससी सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.शासनाने विहित केलेली एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
3. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर / निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.
4. निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती /प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याच निदर्शानास आल्यास त्याची उमेदवारीरद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय दिनांक 1st July 2022. रोजी कमाल 59 वर्षापेक्षा अधिक असू नये.

**मानधन :-** या पदांसाठी मानधन Incentive वर अधारित आहे.

- दरमहा किमान निश्चित मानधन रुपये 22,000/- (अक्षरी रुपये बावीस हजार मात्र).
- दर दिवशी रुग्णसंख्या 50 च्या वर गेल्यास प्रती रुग्ण रु.13/- याप्रमाणे अधिक मानधन दिले जाईल. जेणेकरुन जर दररोज 90 रुग्ण तपासल्यास मासिक मानधन अंदाजे रु.35,000 इतके होईल.
- एका महिन्यात 2,500 किंवा त्यापेक्षा अधिक रुग्ण तपासल्यास औषधनिर्माता यांना रु. 2,000/- अतिरिक्त प्रोस्ताहन मानधन देण्यात येईल.

**निवडीची कार्यपध्दती :-** शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल. प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार दोन किंवा तीन प्रयत्नांत उत्तीर्ण झाला असेल तर अंतिम गुणांमधून 5 गुण, 10 गुण वजा करण्यात येतील. तीन पेक्षा जास्त प्रयत्नांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. समान गुण धारण करणा-या अर्हता प्राप्त उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल. (सेवानिवृत्त कर्मचा-यास प्राधान्य देण्यात येईल) व (पदवीस प्राधान्य देण्यात येईल.)

**सर्वसाधारण अटी :-**

1. सदर नियुक्त्या ह्या निव्वळ कंत्राटी तत्वावर असल्याने त्यांना महापालिकेत कायमस्वरुपी तत्वावरील नोकरीचा हक्क असणार नाही.
2. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही 180 दिवसांकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असेल, 180 दिवसांनी एक दिवसाचा सेवाखंड देऊन काम समाधानकारक असल्यास पूर्ननियुक्ती करण्यात येईल.
3. निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती /प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याच निदर्शानास आल्यास त्याची उमेदवारीरद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**अर्ज भरण्याचे ठिकाण :-** इच्छुक उमेदावारांने आवश्यक ते कागद पत्रांसह अर्ज एफ/दक्षिण कार्यालय 3,मजला बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल मुंबई ,400 012 **एच.बी.टी पॉली क्लिनिक सेल खोली क्र. 49 दि. 24.06.2022 ते 29.06.2022 सकाळी 11 ते संध्याकाळी 5 पर्यंत येथे जमा करण्यात यावा.**

अर्ज हा फॉरमेट प्रमाणे असावा आणि त्यासोबत सर्व आवश्यक ते कागदपत्रांसह असावा अन्यथा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. पात्र उमेदवारांना त्याच्या ई-मेल कळविण्यात येईल.

सही /-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)**

**पदाचे नाव:- कंत्राटी औषधनिर्माता**

उमेदवारांने त्यांच्या
अलिकडे काढलेले
पारपत्र आकाराचे
छायाचित्र लावून
फोटोवर स्वाक्षरी करावी

1.(अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम)(मराठीत) :---------------------------------------------------

(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नांव :---------------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) :---------------------------------------------------

2.पत्ता व दुरध्वनी /मोबाईल क्र. /ई-मेल आयडी :---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

3.लिंग: पुरुष: स्त्री:

4.अ) जन्मदिनांक: :- दिंनाक -------------महिना-------------- वर्ष --------------

ब) दि. 01.04.2021 रोजी असलेले वय---------------- वर्षे---------------- महिने

6.शैक्षणिक अर्हता:-

| **शैक्षणिक अर्हता** | **शालांत परिक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव** | **गुणांचा तपशील** | | **टक्केवारी** | **शालांत परिक्षेतील गुण** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | मराठी | इंग्रजी |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

7. महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल नोंदणी क्रं., दिनांक व विधीग्राह्यता :

8. संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित : आहे/नाही

केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र

9.स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता : -----------------------------------------

-----------------------------------------

आपला/आपली

विश्वासू,

दिनांक:

ठिकाण:- अर्जदाराची सही /-

सोबत

1. फार्मसीमधील पदविका/पदवी
2. FINAL YEAR MARK SHEET
3. PHOTO
4. PAN CARD
5. AADHAR CARD
6. एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र